Reg. No. MCS/069/2018-20 R. N. I. Reg. No. 1591/57

मुंबई, शनिवार, ८ सप्टेंबर २०१८

मुंबई, पुणे, नागपूर, अहमदनगर, औरंगाबाद आणि दिल्ली येथून प्रसिद्ध

लोकसत्ता

लोकमान्य, लोकशक्ती !

| तापमान | कमाल | किमान |
|---|---|---|
| | ३१° सें | २४° सें |

हवामानाचा अंदाज

तुरळक सरींची शक्यता.

## ‘शिवकृपा’चे रबाळे येथे नवीन वास्तूत प्रशासकीय मुख्यालय

**मुंबई :** सहकार क्षेत्रातील बड्या नागरी बँकांपेक्षा अधिक व्यवसाय असलेल्या शिवकृपा सहकारी पतसंस्थेच्या प्रशासकीय मुख्यालयाचे नवी मुंबईतील रबाळे येथील नवीन इमारतीत नुकतेच उद्घाटन झाले. राज्यभरात ८७ शाखा असलेल्या पतसंस्थेची सात स्वतंत्र विभागीय कार्यालये असून त्या सर्वांसह संस्थेकडून स्थापित प्रशिक्षण केंद्राला व्हिडीओ कॉन्फरन्सिंग सुविधेद्वारे या नवीन प्रशासकीय कार्यालयाला जोडण्याची सुविधाही येथे स्थापित करण्यात आली आहे, अशी माहिती शिवकृपाचे संस्थापक आणि अध्यक्ष कृष्णा शेलार यांनी दिली. ३१ ऑगस्ट २०१८ अखेर, १८०७ कोटी रुपयांच्या ठेवी आणि १३७५ कोटी रुपयांच्या कर्ज वितरणाने शिवकृपाचा संमिश्र व्यवसाय ३,१८२ कोटी रुपयांवर गेला आहे. लवकरच तिच्या कोपरखैरण (नवी मुंबई) आणि उरुळीकांचन येथे नवीन शाखा सुरू होत असल्याचे उपाध्यक्ष वसंत चव्हाण यांनी सांगितले.